(इंग्रजी न्यायनिर्णयाचा मराठी भाषेतील अनुवाद )

[१९६१] २ एस. सी. आर. २२२

द मीनरल डेव्हलपमेंट लिमिटेड, कलकत्ता

-विरुद्ध -

द युनियन ऑफ इंडिया आणि इतर

( मुख्य न्यायमूर्ति बी .पी. सिंहा, न्यायमूर्ति जे.एल . कपूर, न्यायमूर्ति पी.बी. गजेंद्रगडकर, न्यायमूर्ति के. सुब्बा राव, न्यायमूर्ति के.एन. वांचू , )

खाणकाम पट्टा - यात पोट पट्ट्याचा समावेश आहे का - खाणी आणि खनिज (विनियमन व विकसन) अधिनियम, १९४८ (१९४८ चा ५३), कलम ३ (डी ) खनिज सवलत नियम, १९४९.

अपीलकर्ता, एक मर्यादित कंपनी, जी खाणकाम पट्ट्याची पट्टेदार होती, त्यांनी त्यांच्या पट्ट्यात समाविष्ट असलेल्या दोन गावांसाठी पोटपट्टा मंजूर केला. कंपनीच्या सचिव आणि दोन संचालकांवर खाणी आणि खनिज (विनियमन व विकसन) अधिनियम, १९४८ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या खनिज सवलत नियम-१९४९ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल त्यांच्यावर खटला चालवण्यात आला. अपीलकर्त्याने, प्रथमतः, असा युक्तिवाद केला की पोटपट्टा हा कायद्याच्या 'खाणकाम पट्टा' या संज्ञेच्या अंतर्गत येत नाही आणि त्यामुळे हा कायदा आणि नियम पोटपट्ट्याला अजिबात लागू होत नाहीत; आणि दुसरे म्हणजे, हे नियम कलम ५ व ६ अंतर्गत तयार करण्यात आले होते, कलम ७ अंतर्गत नाही, तसेच हे अधिनियम आणि नियम लागू झाल्यानंतर सुद्धा इथे पट्टाकाराचा स्वतःचा पट्टा हा अधिनियम आणि नियम लागू होण्यापूर्वीच्या तारखेचा असल्यामुळे, पट्टाकाराने दिलेल्या पोटपट्ट्याला ते लागू होत नाहीत.

असे मानण्यात आले आहे की, खाणी आणि खनिज (विनियमन व विकसन) अधिनियम, १९४८ च्या कलम ३ (डी) मध्ये समाविष्ट असलेल्या "खाणकाम पट्टा" च्या व्याख्येनुसार, पट्टाकार मालक असणे आवश्यक नाही आणि संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ च्या कलम ५ सह वाचलेल्या त्याच्या साध्या भाषेत हे स्पष्ट होते की खाणकाम

पट्ट्यामध्ये मालकाकडून पट्टेदाराने निष्पादित केलेल्या पट्ट्याइतकेच मालकाकडून निष्पादित केलेल्या पट्ट्याचा समावेश असतो. पट्टाकार हा स्वतः पट्टेदार असतो, आणि त्याच्यातील व ज्या व्यक्तीच्या नावाने तो पट्ट्याच्या माध्यमातून हस्तांतरण करतो ती व्यक्ती यांच्यातील व्यवहाराला पोटपट्टा म्हणतात, ही वस्तुस्थिती त्यांच्या दरम्यानच्या हस्तांतरणाचे स्वरूप कोणत्याही प्रकारे बदलत नाही.

पुढे असे मानण्यात आले की, अधिनियमातील कलम ५ व ६ अंतर्गत तयार केलेले नियम पोटपट्ट्याला लागू होतील, जर ते कायदा आणि नियम लागू झाल्यानंतर केले गेले असतील.

**दिवाणी अपील अधिकारिता :- दिवाणी अपील क्र. २३१/१९५५.**

**मालकी हक्क दावा क्र. १०५/१९५३ मध्ये पाटणा उच्च न्यायालयाच्या १६ फेब्रुवारी १९५४ रोजीच्या निकाल आणि हुकूमनाम्या विरुद्ध अपील.**

अपीलकर्त्याच्या बाजूने एन. सी. चॅटर्जी, संजीव चौधरी आणि गणपत राय.

सी. के. डाफ्तरी, भारताचे सॉलिसिटर-जनरल, पी. के. चॅटर्जी आणि टी. एम. सेन, उत्तरवादी क्रमांक १ साठी.

लाल नारायण सिन्हा, बजरंग सहाय आणि आर. सी. प्रसाद, उत्तरवादी क्रमांक २ साठी.

३१ ऑगस्ट १९६० रोजी, न्यायमूर्ति वांचू यांच्या द्वारे दिला गेलेला न्यायालयाचा निर्णय :-

हे पाटणा उच्च न्यायालयाच्या हुकूमनाम्याविरुद्ध केलेले अपील आहे. अपीलकर्ता ही एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे जिचे नोंदणीकृत कार्यालय कलकत्ता येथे आहे. कंपनीला रामगढच्या राजाने २९ डिसेंबर १९४७ रोजी रामगढ इस्टेटमध्ये असलेल्या ३०२६ गावे ९९९ वर्षांच्या कालावधीसाठी खाणकाम पट्ट्याने दिली आणि अपीलकर्त्याला त्याचा ताबा देण्यात आला. १ फेब्रुवारी १९५० रोजी, अपीलकर्त्याने त्यांना देण्यात आलेल्या गावात समाविष्ट असलेल्या दोन गावांचा पोटपट्टा भगतसिंग यांना १५ वर्षांच्या कालावधीसाठी दिला. दरम्यान, ज्या भागात ही दोन्ही गावे होती, तिथे खाणी आणि खनिज (विनियमन व

विकसन) अधिनियम,  (१९४८ चा ५३), (यापुढे अधिनियम म्हणून उल्लेखित) आणि खनिज सवलत नियम, १९४९ अमलात आले (यापुढे नियम म्हणून उल्लेखित). त्यामुळे भगतसिंग यांनी नियमांनुसार मान्यता प्रमाणपत्र घेण्यासाठी हजारीबागच्या उपायुक्तांकडे अर्ज दाखल केला. त्यानंतर उपायुक्तांनी, देण्यात आलेला पोटपट्टा, हा कायदा आणि नियमांचे उल्लंघन करणारा आहे हे लक्षात घेऊन, २५ सप्टेंबर १९५१ रोजी दंडाधिकाऱ्यांसमोर अपीलकर्त्याच्या दोन संचालक आणि सचिवांविरुद्ध नियमांच्या नियम ४५ व नियम ४७ आणि ४९ ( आताचे नियम ५१) सह नियम ५१ ( आताचे नियम ५३) आणि अधिनियमाचे कलम ९ चे उल्लंघन केल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली. फौजदारी खटला सुरू असतानाच, अपीलकर्त्याने अधिनियम आणि नियमांची वैधता आणि घटनात्मकतेला आव्हान देणारा खटला दाखल केला. या आव्हानाच्या समर्थनार्थ अनेक कारणे देण्यात आली होती, परंतु आता ते सर्व मांडण्याची गरज नाही, कारण अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने त्याचे युक्तिवाद केवळ दोन मुद्द्यांपुरते मर्यादित ठेवले आहेत, ते म्हणजे (१) पोटपट्टा अधिनियमाच्या कलम ३ (डी) मधील 'खाणकाम पट्टा ' या संज्ञेच्या अंतर्गत येत नाही आणि म्हणून अधिनियम आणि नियम पोटपट्ट्याला अजिबात लागू होत नाहीत आणि (२) हे नियम कलम ५ आणि ६ अंतर्गत तयार करण्यात आले होते, कलम ७ अंतर्गत नाही, तसेच हे अधिनियम आणि नियम लागू झाल्यानंतर सुद्धा इथे पट्टकाराचा स्वतःचा पट्टा हा अधिनियम आणि नियम लागू होण्यापूर्वीच्या तारखेचा असल्यामुळे, पट्टकाराने दिलेल्या पोटपट्ट्याला ते लागू होत नाहीत.

उत्तरवादींनी या खटल्याला विरोध केला आणि त्यांचा बचाव असा होता की 'खाणकाम पट्टा' या शब्दामध्ये पोटपट्ट्याचा समावेश होतो आणि अधिनियमाच्या कलम ५ आणि ६ अंतर्गत तयार केलेले नियम, हे अधिनियम आणि नियम लागू झाल्यानंतर देण्यात आलेल्या सर्व पोटपट्ट्यांना लागू होतात.

अधिनियम आणि नियमांची वैधता आणि घटनात्मकतेविरुद्ध अपीलकर्त्याने उपस्थित केलेले युक्तिवाद उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. त्यात पुढे असे म्हटले आहे की अधिनियमाच्या कलम ३ (डी) मध्ये परिभाषित केल्यानुसार 'खाणकाम पट्टा' या संज्ञेमध्ये पोटपट्ट्याचा समावेश आहे आणि म्हणूनच अधिनियम व नियम लागू झाल्यानंतर देण्यात आलेल्या पोटपट्ट्यांना अधिनियम व नियम लागू होतात आणि अपीलकर्त्याला दिलेला पट्टा

हा अधिनियम व  नियम लागू होण्याच्या वेळेपूर्वीचा होता हे महत्त्वाचे नाही. या दृष्टिकोनातून खटला फेटाळण्यात आला. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रमाणपत्रासाठी अर्ज केला जो मंजूर करण्यात आला आणि अशा प्रकारे हे प्रकरण आमच्यासमोर आले आहे.

आर.इ .(R .e.) (i )

अधिनियमाच्या कलम ३ (डी) मध्ये परिभाषित केल्यानुसार 'खाणकाम पट्टा' या संज्ञेमध्ये पोटपट्ट्याचा समावेश आहे का हा विचार करण्यासारखा मुख्य प्रश्न आहे. कलम ३ चा खंड (ड) खालील शब्दात आहे :-

“ 'खाणकाम पट्टा' या शब्दप्रयोगाचा अर्थ, खनिज तेलांचा शोध घेण्यासाठी, ती निष्कर्षीण्यासाठी, त्याकरिता खाणकाम करण्यासाठी, ती प्राप्त करण्यासाठी, त्यांना विक्रेययोग्य बनवण्यासाठी, त्यांची ने-आण करण्यासाठी किंवा विल्हेवाट लावण्यासाठी किंवा त्या गोष्टींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी दिलेला पट्टा असा आहे, आणि त्या शब्दप्रयोगात, समन्वेषण अनुज्ञप्ति किंवा पूर्वेक्षण अनुज्ञप्ति याचा समावेश होतो ;”

त्यात पोटपट्ट्याचा कोणताही विशिष्ट उल्लेख नाही. परंतु जर एखाद्याने कलम ३ (डी) मध्ये वापरलेल्या शब्दांचा साधा अर्थ घेतला तर हे स्पष्ट आहे की 'खाणकाम पट्टा' या शब्दप्रयोगाचा अर्थ, खनिजांचा शोध घेण्यासाठी, ती निष्कर्षीण्यासाठी त्याकरिता खाणकाम करण्यासाठी, ती प्राप्त करण्यासाठी, त्यांना विक्रेययोग्य बनवण्यासाठी, त्यांची ने-आण करण्यासाठी किंवा विल्हेवाट लावण्यासाठी किंवा त्या गोष्टींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी दिलेला पट्टा  असा आहे. हे महत्वपूर्ण आहे की या व्याख्येसाठी पट्टाकार  हा मालक असणे आवश्यक नाही; आणि त्यामुळे न्यायबुद्धीने वाचल्यास  त्यात पट्टेदाराने निष्पादित केलेल्या पट्ट्याइतकेच मालकाकडून  निष्पादित केलेल्या पट्ट्याचा समावेश असतो. जर आपण मालमत्ता हस्तांतरण कायद्याच्या कलम १०५ मधील ' भाडेपट्टा ' या शब्दाची व्याख्या वाचली, तर आपल्याला असे दिसते की स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा म्हणजे हस्तांतरितीने हस्तांतरकाला  दिलेली किंवा देण्याचे वचन दिलेली किंमत अथवा नियतकालांतर्गणिक किंवा विनिर्दिष्ट प्रसंगी द्यावयाचे पैसे, पिकाचा वाटा, सेवा किंवा अन्य कोणतीही मौल्यवान वस्तू यांच्या प्रतिफलार्थ हस्तांतरकाने व्यक्तपणे किंवा उपलक्षणेने निश्चित काळाकरिता किंवा शाश्वत काळाकरिता केलेले व हस्तांतरितीने अशा अटींवर स्वीकारलेली, अशा संपत्तीचा उपभोग घेण्याच्या अधिकाराचे हस्तांतरण होय. त्यामुळे

भाडेपट्टयासाठी  हस्तांतरक  व  हस्तांतरिती  आणि कलम १०५ मध्ये नमूद केलेल्या अटी आणि शर्तींवर स्थावर संपत्ति हस्तांतरण आवश्यक आहे. जोपर्यंत व्यवहार कलम १०५ मध्ये परिभाषित केलेल्या स्वरूपाचा आहे तोपर्यंत हस्तांतरकास भाडेपट्टा करण्यासाठी त्याचा हक्क कसा मिळतो हे महत्त्वाचे नाही. त्यामुळे कायद्याच्या कलम ३ (डी) चे साधे शब्द आणि मालमत्ता हस्तांतरण कायद्याच्या कलम १०५ मध्ये समाविष्ट असलेल्या भाडेपट्ट्याची व्याख्या लागू करताना, हे अगदी स्पष्ट आहे की या प्रकरणात एक हस्तांतरक (म्हणजे, अपीलकर्ता) आणि हस्तांतरिती (म्हणजे, भगत सिंग) आहे ज्याने हस्तांतरण स्वीकारले आहे; व्यवहार स्थावर संपत्ति संदर्भात आहे व  विशिष्ट कालावधीसाठी अशा मालमत्तेचा उपभोग घेण्याचा अधिकार निर्माण करतो  आहे आणि त्यात नमूद केलेल्या अटींवर. तथापि, हस्तांतरक हस्तांतरित केलेल्या मालमत्तेचा मालक नसून स्वतः पट्टेदार आहे या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर दस्तऐवजाला पोटपट्टा  म्हटले जाऊ शकते, परंतु अपीलकर्ता आणि भगत सिंग यांच्यातील व्यवहार हा खाणकाम पट्ट्याशिवाय काही नाही. 'पोट पट्टा , 'अंडर-लीज' (under-lease) आणि 'डेरीवेटीव्ह लीज '(derivative lease ) या संज्ञा केवळ हस्तांतरण हा भाडेपट्टा नव्हे तर हस्तांतरक हा  मालमत्तेचा मालक नसून पट्टेदार आहे हे सूचित करण्यासाठी सोयीस्करपणे वापरल्या जातात; परंतु पट्टेदार आणि पोट-पट्टेदार यांच्यातील हस्तांतरण हे भाडेपट्टा आहे, जर ते कलम १०५ ची व्याख्या पूर्ण करत असेल. आपण हेही जोडू शकतो की संपत्ती हस्तांतरण अधिनियमाचे प्रकरण ५, जे स्थावर संपत्ती भाडेपट्ट्यांशी संबंधित आहे त्यात  भाडेपट्टी आणि पोट-भाडेपट्ट्यामध्ये कुठेही कोणताही फरक केलेला नाही आणि भाडेपट्ट्याला लागू होणाऱ्या त्या प्रकरणातील सर्व तरतुदी पोट -भाडेपट्ट्यालाही लागू होतात. पट्टेदाराचे हक्क आणि दायित्वे हाताळतानाच संपत्ती हस्तांतरण अधिनियमाच्या कलम १०८ (जे) मध्ये असे नमूद केले आहे की पट्टेदारला   संपत्तींतील     आपला संपूर्ण हितसंबंध किंवा त्याचा कोणताही भाग अबाधितपणे अथवा गहाणाच्या किंवा पोटपट्याच्या रूपाने हस्तांतरित करता येईल , आणि तेथेच एखाद्याला पोटपट्ट्याचा उल्लेख आढळतो, म्हणजे तो स्वतः पट्टेदार  असलेल्या व्यक्तीने दिलेला भाडेपट्टा आहे. परंतु  पट्टाकार हा स्वतः पट्टेदार असतो आणि त्याच्यातील आणि ज्या व्यक्तीच्या बाजूने तो भाडेपट्ट्याच्या माध्यमातून हस्तांतरण करतो त्या व्यक्तीमधील व्यवहाराला पोटपट्टा  म्हणतात, त्यामुळे त्यांच्या दरम्यानच्या हस्तांतरणाचे स्वरूप कोणत्याही प्रकारे बदलत नाही. त्यामुळे संपत्ती हस्तांतरण

अधिनियमाच्या कलम १०५ सह कलम ३ (डी) च्या साध्या शब्दांवर 'खाणकाम पट्टा' या संज्ञेमध्ये पोटपट्टीचा समावेश आहे यात शंका नाही.

अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने या संदर्भात अनेक कायद्यांचा संदर्भ दिला आहे ज्यात पोटपट्ट्याचा 'भाडेपट्टा' या संज्ञेमध्ये समावेश असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. खाणी आणि खनिज (विनियमन व विकसन) अधिनियम-१९५७ (१९५७ चा ६७) मध्ये, ज्याने या कायद्याची जागा घेतली आहे, 'खाणकाम पट्टा' या शब्दाची व्याख्या कलम ३ (सी) मध्ये करण्यात आली आहे, ज्याचा अर्थ खाणकामे हाती घेण्याच्या प्रयोजनासाठी दिलेला पट्टा असा होतो आणि त्यात पोटपट्ट्याचा समावेश होतो. या प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या निकालानंतर १९५७ चा कायदा लागू करण्यात आला आणि विधानमंडळाला असे म्हणणे योग्य वाटले की पोटपट्टा 'खाणकाम पट्टा ' या संज्ञेमध्ये समाविष्ट आहे. संबंधित इंग्रजी कायद्यात तसेच मालमत्ताविषयक इंग्रजी कायदा, १९२५ मध्ये, पोटपट्टा समाविष्ट करण्यासाठी भाडेपट्ट्याची व्याख्या करण्यात आली आहे. तथापि, वस्तुस्तिथी अशी आहे की काही कायद्यांमध्ये पोटपट्ट्याचा समावेश भाडेपट्ट्याच्या व्याख्येमध्ये केला जातो, आणि नसेल, तर याचा अर्थ असा नाही की भाडेपट्ट्यामध्ये पोटपट्टाचा समावेश असू शकत नाही. याउलट एक उदाहरण म्हणजे संपत्ती हस्तांतरण अधिनियम, ज्यामध्ये या शब्दाच्या व्याख्येमध्ये स्पष्टपणे पोटपट्टा समाविष्ट आहे. अपीलकर्त्याचे विद्वान वकील यांनी देखील काही निर्णयांवर भर दिला होता ज्यात असे म्हटले गेले होते की भाडेपट्ट्यामध्ये पोटपट्ट्याचा समावेश नाही. तथापि, त्या निर्णयांमुळे तेथे विचाराधीन असलेल्या अधिनियमाच्या विशिष्ट अटी लागू होतात आणि कायद्यातील 'खाणकाम पट्टा' या संज्ञेमध्ये पोटपट्याचा समावेश आहे की नाही हा प्रश्न निश्चित करण्यात कोणतीही मदत होत नाही. सामान्यतः, विशिष्ट कायद्यात त्याउलट काहीही नसेल तर भाडेपट्ट्यामध्ये पोटपट्याचा समावेश असेल. या संदर्भात आपण कॅम्बरवेल आणि साउथ लंडन बिल्डिंग सोसायटी -वि.- हॉलोवे[1] पृष्ठ ७५९ मधील जेसल, एम. आर. यांच्या निरीक्षणांचा संदर्भ घेऊ शकतोः

"कायद्यातील 'भाडेपट्टा ' हा शब्द सुस्पष्ट, महत्वाची, तसेच एक सुप्रसिद्ध कायदेशीर संज्ञा आहे. हे कोणत्याही वकिलाने कधीही सुचवले नाही की पट्टाकाराच्या हक्कामुळे संलेखाच्या वर्णनात काही फरक पडतो, जरी भाडेपट्टा फ्रीहोल्डर(freeholder किंवा

[1] (I ) (१८९७) १३ सी येच दि ७५४-७५९

लॉर्डच्या परवान्यासह कॉपीहोल्डर (copyholder ) किंवा स्वतः पट्टाधारक असलेल्या व्यक्तीने दिला आहे की नाही. वर्षांच्यां कालावधीसाठी योग्य प्रकारे दिल्यामुळे त्याला भाडेपट्टा म्हणतात. हे अगदी खरे आहे की जेथे भाडेपट्टा देणारा एका मुदतीसाठी धारण करतो, तेथे दुसऱ्या संलेखाला एकतर अंडरलीज (under lease) भाडेपट्टी किंवा डेरिव्हेटीव्हलीज (derivative lease) म्हणतात, परंतु तरीही तो भाडेपट्टाच असतो .... . ."

कलम ३(डी ) मध्ये परिभाषित केलेल्या 'खाणकाम पट्टा ' ह्या व्याख्येमधे पोटपट्ट्याचा अर्थ समाविष्ट नाही आहे, असे सूचित करण्यासाठी आपल्याला कायद्यात काहीही दिसत नाही. दुसरीकडे, ज्या प्रयोजनाकरिता आणि उद्देशाने हा कायदा लागू करण्यात आला होता, त्याकडे पाहताना आम्हाला हे अगदी स्पष्ट दिसते की पोटपट्ट्याचा समावेश 'खाणकाम पट्टा ' या संज्ञेमध्ये केला जाणे आवश्यक आहे, कारण त्याचा अर्थ स्पष्टपणे कलम ३ (डी) च्या साध्या शब्दात आहे.

हा कायदा लोकहितासाठी मंजूर करण्यात आला होता, हे या वस्तुस्थितीवरून दिसून येते की त्यात खाणी आणि तेल क्षेत्रांचे विनियमन आणि खनिजांच्या विकासनाची तरतूद आहे. देशातील खनिज संपत्तिचे संवर्धन केले जावे व तिचा अपव्यय न करता अशा प्रकारच्या कामात निपूण असलेल्या व्यक्तिंनी ते काम योग्य प्रकारे केले पाहिजे, असा हेतू होता. हा उद्देश लक्षात घेऊन कलम ५ मध्ये इतर गोष्टींबरोबरच खाणकाम पट्टा कोणत्या अटींवर दिला जाऊ शकतो, जास्तीत जास्त किंवा किमान क्षेत्र तसेच किती कालावधीसाठी असा भाडेपट्टा दिला जाऊ शकतो, तसेच संलग्न क्षेत्रांच्या संदर्भात भाडेपट्ट्यांचे विलीनीकरण कोणत्या अटींवर केले जाऊ शकते, तसेच पट्टेदाराला देय असलेले जास्तीत जास्त आणि किमान भाडे निश्चित करण्यासाठी, तसेच खाण कार्यरत आहे की नाही, यासंदर्भात नियम बनवण्याची तरतूद आहे. कलम ६ मध्ये खनिजांच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी , तसेच ज्या पद्धतीने कोणतेही खनिज किंवा खाणकाम पट्टा देण्यास मनाई आहे अशा कोणत्याही क्षेत्राचा विकास करण्यासाठी आणि इंजिन, यंत्रसामग्री किंवा इतर उपकरणांच्या वापराची शिफारस किंवा नियमन करून कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही खनिज संपत्तीचा विकास करण्यासाठी आणि इतर नियम तयार करण्याची तरतूद आहे. जर पोटपट्ट्याचा 'खाणकाम पट्टा ' या संज्ञेमध्ये समावेश केला गेला नसता, तर खाण क्षेत्र आणि खनिजांच्या संवर्धन, विकास आणि नियमनासाठीच्या या तरतुदी कमी-अधिक प्रमाणात पूर्णपणे अपयशी

ठरल्या असत्या, आणि तेव्हा एखाद्या व्यक्तीसाठी जो कायदा टाळण्यास इच्छुक आहे, तो स्वतः आणि मालक यांच्यात मध्यस्थी करून त्याच्याकडून पोटपट्टा घेईल, जे कायदा आणि नियमांच्या नियामक नियंत्रणापासून मुक्त असेल. त्यामुळे आमचे असे मत आहे की कलम ३ (डी) सरळ शब्दात वाचल्यास आणि ज्या प्रयोजनाकरीत आणि उद्देशाने हा कायदा लागू करण्यात आला होता त्याकडे पाहता, हे स्पष्ट आहे की पोटपट्टा 'खाणकाम पट्टा' या संज्ञेच्या व्याख्येत समाविष्ट आहे आणि कायद्यात असे काहीही नाही जे याच्या विरोधात आहे. म्हणून आम्ही असे मानतो की कायदा आणि नियम लागू झाल्यानंतर दिलेला खाणकाम पोटपट्टा कलम ३(डी) मध्ये परिभाषित केल्यानुसार 'खाणकाम पट्टा' या संज्ञेमध्ये समाविष्ट आहे आणि तो कायदा आणि नियमांच्या अधीन आहे.

आर.इ .(R .e.)(ii)

या संदर्भात युक्तिवाद असा आहे की अधिनियमाच्या कलम ४ मध्ये अशी तरतूद आहे की हा अधिनियम लागू झाल्यानंतर या अधिनियमाखाली केलेल्या नियमांस अनुसरून असल्याखेरीज कोणताही खाणकाम पट्टा देता येणार नाही आणि अन्यथा कोणताही खाणकाम पट्टा, जो देण्यात आला आहे तो प्रभावहीन राहील आणि त्यावर कुठलाही परिणाम होणार नाही. कलम ५ आणि ६ केंद्र सरकारला वर नमूद केलेल्या हेतूंसाठी आणि कलम ४ अंतर्गत देण्यात आलेल्या खाणकाम पट्ट्यांच्या संदर्भात नियम बनवण्याचा अधिकार देतात. त्यानंतर कलम ७ आहे, ज्यामध्ये असे नमूद केले आहे की हा अधिनियम लागू होण्यापूर्वी देण्यात आलेला कोणताही खाणकाम पट्टा कलम ५ व ६ अन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधांशी अनुरूप करून घेण्याच्या दृष्टीने त्या पट्ट्याच्या अटी व शर्ती यांमध्ये फेरफार किंवा बदल करण्यासाठी केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल. असे कथन करण्यात आले आहे की जेथे अधिनियम आणि नियम लागू होण्यापूर्वी खाणकाम पट्टा देण्यात आला आहे, तेथे अशा पट्टेदारांनी दिलेल्या कोणत्याही पोटपट्ट्यावर केवळ कलम ७ अंतर्गत तयार केलेले नियम लागू होतील, जरी पोटपट्टा, कायदा आणि नियम लागू होण्याच्या तारखेनंतर देण्यात आला असला तरी. आमच्या मते कलम ७ पूर्णपणे वेगळ्या उद्देशाने अधिनियमित करण्यात आला होता, जसे की त्याच्या पोटकलम (२) मधून दिसून येते. तथापि, या प्रकरणात पुढे जाण्याची आवश्यकता नाही, कारण एकदा असे मानले गेले की पोटपट्टा हा 'खाणकाम पट्टा' या संज्ञेमध्ये समाविष्ट आहे तर नियम ५ व ६ अंतर्गत तयार

केलेले नियम अशा पोटपट्याला लागू होतील जर तो अधिनियम आणि नियम अमलात आल्यानंतर देण्यात आला असेल. सध्याच्या प्रकरणात, ज्या क्षेत्राशी पोटपट्ट्याचा संबंध आहे अशा क्षेत्रात अधिनियम आणि नियम अमलात आल्यानंतर पोटपट्टा देण्यात आला होता आणि त्यामुळे अधिनियम आणि नियमांद्वारे पोटपट्ट्याचे नियमन केले जाईल. या प्रकरणात, कायदा लागू होण्यापूर्वी मंजूर केलेल्या कोणत्याही खाणकाम पट्ट्याच्या अटी आणि शर्तींमध्ये बदल करण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, अशा पोटपट्ट्याला ज्याला अधिनियम आणि नियम लागू करण्यात आले आहेत आणि जो अधिनियम आणि नियम अमलात आल्यावर कलम ३ (डी) मधील संज्ञेच्या व्याख्येनुसार खाणकाम पट्टा आहे. अपीलकर्त्याला देण्यात आलेल्या खाणकाम पट्ट्याच्या अटी आणि शर्तींमध्ये नियमांद्वारे कोणताही बदल केला जात नाही आहे आणि जे घडले आहे ते म्हणजे अपीलकर्त्याचे संचालक आणि सचिव यांच्यावर कायदा लागू झाल्यानंतर कायदा आणि नियमांच्या तरतुदींविरुद्ध पोटपट्टा (जो खाणकाम पट्टा आहे) दिल्याबद्दल खटला चालविला जात आहे. त्यामुळे अपीलकर्त्याच्या या युक्तिवादात कोणताही प्रभाव नाही आणि त्यामुळे तो फेटाळला गेला पाहिजे.

हे अपील प्रभावी नाही आणि याद्वारे ते खर्चासह फेटाळले जाते. एका सुनावणीचा खर्च फक्त.

याचिका फेटाळण्यात आली.

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."